महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक:- १४४२/गट-क संयुक्त-तां.स./२०२१/२४ दिनांक :- १९ जून, २०२३

**-: प्रसिद्धीपत्रक :-**

**विषय :- महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा-२०२१ (जाहिरात क्रमांक-६१/२०२२) तांत्रिक सहायक संवर्गाच्या प्रतीक्षायादीवरील उमेदवारांच्या शिफारशीबाबत**

शासनाने दिनांक ११ मे, २०२३ रोजीच्या पत्रान्वये मागणी केल्यानुसार महाराष्ट्र गट- क सेवा मुख्य परीक्षा-२०२१ मधील तांत्रिक सहायक संवर्गाच्या (जाहिरात क्र. ६१/२०२२) प्रतीक्षायादी मधून एकूण ०६ उमेदवारांची शिफारस शासनास करण्यात येत आहे.

**२.** प्रस्तुत परीक्षेच्या प्रतीक्षायादीवरील उमेदवारांच्या शिफारशी त्यांनी प्रस्तुत परीक्षेच्या अर्जात नमूद केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने त्यांची पात्रता नियुक्तीपूर्वी शासन स्तरावरुन मूळ प्रमाणपत्रांच्या आधारे तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून शासनाकडे करण्यात येत आहेत. सदर तपासणीत उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता न केल्यास शासन स्तरावर अधिसूचनेतील तरतूदीनुसार दावे तपासतांना किंवा अन्य कारणामुळे अपात्र ठरणा-या संबंधित उमेदवारांची उमेदवारी/ शिफारस कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

**३.** प्रस्तुत परीक्षेच्या अर्जात माजी सैनिक असल्याचा केलेला दावा विचारात घेऊन या उमेदवारांची शिफारस माजी सैनिकांसाठी राखीव असलेल्या पदावर ते सैनिकी सेवेतील विहित वैध/पुरेसा अनुभव धारण करतात व ते माजी सैनिकांसाठी आरक्षित असलेल्या पदासाठी पात्र आहेत आणि त्यांच्याकडे माजी सैनिकांसाठी आवश्यक असलेली सर्व मूळ प्रमाणपत्रे आहेत, हे नियुक्तीपूर्वी शासनस्तरावर होणा-या विनिर्दिष्ट पडताळणीत पात्र ठरण्याच्या अटीच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

**४.** उमेदवारांच्या माहितीसाठी प्रतीक्षायादीतून शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

ठिकाण : नवी मुंबई

उपसचिव(परीक्षोत्तर अराजपत्रित)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग